उप आयुक्त कार्यालय
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका
जावक क्र.- घकव्यका/२३७६
दिनांक :- १०/०८/२०२६

प्रति,
व्यवस्थापक
इको एक्सिस्ट फाउंडेशन
यांस...

**विषय :- गणेशोत्सव २०२६ अंतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी पुनरावर्तन उपक्रम राबविणेबाबत.**

**संदर्भ :- मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ) यांची दिनांक ०५/०८/२०२६ रोजीची मान्यता.**

सालाबादप्रमाणे दिनांक १४/०९/२०२६ ते २५/०९/२०२६ या कालावधीत पुणे शहरात सर्वत्र सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जाणार आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या अनुषंगाने दर वर्षी पुणे महानगरपालिकेमार्फत नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात असतात. यामध्ये मूर्ती संकलन केंद्रांची स्थापना, निर्माल्य संकलन केंद्रांची स्थापना, निर्माल्यापासून अगरबत्ती निर्मिती असे विविध उपक्रम पुणे महानगरपालिका व विविध स्वयं सेवी संस्थांमार्फत राबविण्यात येत असतात.

पुणे महानगरपालिका व ECOEXIST संस्थेमार्फत मागील चार वर्षीच्या गणेशोत्सव काळात "पुनरावर्तन" हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला होता. यामध्ये ECOEXIST संस्था, स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था व इतर विविध स्वयं सेवी संस्थांमार्फत गणेश विसर्जनानंतरची शाडूची माती संकलित करून त्याचा पुर्नवापर करण्यात येतो. गणेशोत्सव २०२६ च्या कालावधीमध्ये देखील पुनरावर्तन उपक्रम राबविणेसाठी उपरोक्त संदर्भांकित मान्यता प्राप्त झाले असून त्यानुसार सदर उपक्रम राबविण्यात येणार आहे.

सदर प्रकल्पामध्ये पुणे महानगरपालिकेची व ECOEXIST व इतर स्वयंसेवी संस्थांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील.

मनपाची जबाबदारी :-

1. पुनरावर्तन २०२६ उपक्रमाचा प्रचार व प्रसार करणे. यामध्ये उपक्रमाचे हन्डबिल्स तयार करणे, प्रत्येक विसर्जन घाटाच्या ठिकाणी पोस्टर्स/बॅनर्स लावणे व घंटागाडीवर उपक्रमाविषयीच्या ऑडीओ क्लिप्स मार्फत जनजागृती करणे इ.बाबी करण्यात येतील.
2. क्षेत्रिय कार्यालयांतर्गत मूर्ती विसर्जनाच्या सर्व ठिकाणी शाडू मातीच्या गणेशमूर्ती विसर्जनासाठी स्वतंत्र हौद/टाकीची व्यवस्था करणे.

Scanned with OKEN Scanner

3. १५ क्षेत्रिय कार्यालयांमार्फत गणेशोत्सव २०२६ काळात संकलित होणा-या शाडू मातीच्या गणेशमुर्त्या तसेच शाडूची माती क्षेत्रिय कार्यालयाच्या सोयीनुसार मांगडेवाडी किंवा वाघोली येथील C & D waste प्रक्रिया प्रकल्पाचे ठिकाणी नेऊन जमा करणे.
4. विसर्जन घाटावर किंवा इतर संकलन केंद्राची ठिकाणी संकलित होणारी शाडू माती किंवा मूर्ती यांचे वजन व नोंदी जतन करणे.

ECOEXIST संस्थेची जबाबदारी :-

1. क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सर्व मूर्ती विसर्जन व संकलन केंद्रांचे ठिकाणी शाडू माती मूर्ती स्वतंत्रपणे विसर्जित करणे किंवा दान करणेबाबत जनजागृती करणेकरीता आवश्यक समन्वयक नेमणे.
2. संकलित शाडू माती मुर्त्या तसेच माती पुर्नवापरासाठी मूर्तीकारांना देणे, त्याच्या नोंदी ठेवणे व या अनुषंगाने इतर सर्व जबाबदारी संस्थेची राहील.
3. संकलित होणा-या शाडू मातीचे वजन करणे व त्याचा अहवाल जतन करणे तसेच वाघोली व मांगडेवाडी येथे जमा झालेल्या सर्व शाडू मुर्त्या व शाडू माती हे किमान १ महिना कालावधीमध्ये सदर ठिकाणाहून उचलून घेणे व संबंधीत मूर्तीकारांना देणेची जबाबदारी ECOEXIST संस्थेची राहील.

तरी वरील नमूद बाबींच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिका व ECOEXIST यांचे संयुक्त विद्यमाने गणेशोत्सव २०२६ दरम्यान पुनरावर्तन २०२६ उपक्रम राबविण्यात यावा.
कळावे.

SSVarule 6/8/26
(संतोष वारुळे)
उपायुक्त
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका

प्रत-

१) मा.उपायुक्त, परिमंडळ क्र. १ ते ५, पुणे महानगरपालिका.
२) महापालिका सहाय्यक आयुक्त, सर्व क्षेत्रिय कार्यालये, पुणे महानगरपालिका
यांस पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी...

Scanned with OKEN Scanner